# कोविड–१९ विषाणू संसर्ग/प्रादुर्भाव रोखण्यासाठी विविध विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना

# मार्गदर्शक सूचना



## संपादक

**डॉ. रविंद्र झेंडे**, प्राध्यापक व विभाग प्रमुख,
पशुवैद्यकीय सामूहिक स्वास्थ्य विभाग

**डॉ. विलास वैद्य**, सहाय्यक प्राध्यापक,
पशुवैद्यकीय सामूहिक स्वास्थ्य विभाग

**डॉ. मनिष सावंत**, सहाय्यक प्राध्यापक,
पशुवैद्यकीय व पशुसंवर्धन विभाग

**मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय,**
**परळ, मुंबई — ४०००१२**

राज्यात कोविड १९ या विषाणूच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे संसर्गाचे प्रमाण वाढत असल्याचे आढळून येत आहे. अशा या आपत्कालीन परिस्थितीत कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचारी आपले कर्तव्य पार पाडत असताना काही अधिकारी/कर्मचारी कोविड–१९ ने बाधित झाल्याचे निदर्शनास आले आहे.

केंद्र आणि राज्य शासनाकडून कोवीड १९ प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत सर्व माध्यमातून मोठया प्रमाणात जनजागृती करण्यात आलेली आहे. त्यानुसार भविष्यात या आजाराचा संसर्ग टाळण्यासाठी घ्यावयाच्या दक्षतेबाबत खालीलप्रमाणे मार्गदर्शक सुचना देण्यात येत आहेत.

**मार्गदर्शनपर सुचना :**

- कर्तव्यावर जाताना नियमानुसार मास्क, हातमौजे व आवश्यकतेनुसार ॲप्रन परिधान करावा.



- कार्यालयात अथवा कामकाजाच्या ठिकाणी साबण, पाणी व हॅन्ड सॅनिटायझर उपलब्ध असल्याचे खातरजमा करावी





.

- आपल्या दैनंदिन कामकाजाला सुरूवात करण्यापुर्वी आपले हात साबण व पाण्याने किमान २० सेकंद स्वच्छ धुवावे. त्यानंतरच हातमोज्यांचा उपयोग करावा. हातमोजे घातल्यानंतर चेहरा, डोळे, नाक, तोंड यास स्पर्श करू नये. हातमोजे खिशात घालण्याचे टाळावे.



- जेथे सॅनिटायझर उपलब्ध असेल तेथे किमान ७ मिलीलिटर सॅनिटायझर हातावर घेउन दोन्ही तळहातांना मागेपुढे लावावे. सॅनिटायझर किमान ६० टक्के अल्कोहोल असण्याचे असावे.

- आपण ज्या कार्यालयात अथवा कर्तव्याच्या ठिकाणी काम करत असू व ज्या वस्तूंना वारंवार हाताने स्पर्श होण्याचा संभव आहे अशा गोष्टींना ( दरवाज्याचे हॅन्डल, पाण्याचे नळ इत्यादी) दोन ते तीन तासाने एक टक्का प्रमाणात सोडीयम हायपोक्लोराईड असलेल्या निर्जंतुकीकरण द्रावणाने स्वच्छ करावे.





- हाताने चेहरा, डोळे, नाक, तोंड यास स्पर्श करू नये.



- दैनंदिन काम करताना दोन व्यक्तींमधील कमितकमी अंतर एक मिटर ठेवावे.




- एकत्रित जास्त संख्येने काम करण्याची वेळ आल्यास कामाच्या ठिकाणी छोटे छोटे समूह करण्यात यावे जेणेकरून अपघाताने कोविड १९ चा संसर्ग झाल्यास फक्त त्या समुहातील संपर्क व्यक्तींचे विलगीकरण करणे शक्य होईल व दैनंदिन कामकाजावर विपरित परिणाम टाळता येईल.



- भ्रमणध्वनीचा वापर करताना शक्यतो स्पिकरफोनचा वापर करावा. भ्रमणध्वनीचा स्पर्श शक्यतो चेहऱ्याला टाळावा.




- कार्यालयातून/कर्तव्याच्या ठिकाणावर आंघोळ करण्याची सुविधा उपलब्ध नसल्यास कर्तव्यावरून घरी परत गेल्यावर लगेच साबण व स्वच्छ पाण्याने आंघोळ करावी.



**वैयक्तिक संरक्षक साधनांचा वापर:**

- अधिकारी व कर्मचारी यांनी कर्तव्य बजावत असताना वैयक्तिक संरक्षक साधनांचा योग्यपणे व नियमित वापर करावा.



- मास्क वापरतांना सदर मास्क तोंड व हनुवटी झाकून जाईल अशा पध्दतीने लावावा. नाकावर ठेवण्यायोग्य भाग नाकाच्या हाडावर बसवावा. मास्कची लेस कानावरून व मानेच्या मागील बाजूस बांधावी जेणेकरून आपला चेहरा व मास्क यामध्ये अंतर राहणार नाही याची खात्री करावी. मास्क मानेला लटकवू नये, चेहऱ्यावरील मास्कला स्पर्श करणे टाळावे. मास्क ओलसर झाल्यास तो त्वरीत बंद कचरापेटीत शक्यतो कागदात लपेटून फेकावा व नविन मास्क घालावा. मास्क काढतांना प्रथमत: खालील बाजूने काढावा नंतर लेसचा वापर करून मास्क हाताळावा. मास्क काढतांना मास्कचा शरीराच्या इतर कोणत्याही भागास स्पर्श होणार नाही याची काळजी घ्यावी. त्याचप्रमाणे वापरलेले मास्क, रबरी हातमोजे इत्यादींची विल्हेवाट बंद कचरापेटीत करावी.



- कर्तव्य बजावत असताना अधिकारी व कर्मचारी यांनी एकमेकांचे मोबाईल फोन, रूमाल, पाणी बॉटल, ग्लास इत्यादी बाबी वापरू नयेत अथवा हाताळू नयेत.
- सर्दी, खोकला, ताप आणि श्वास घेतांना त्रास होत असल्यास आपल्या डॉक्टरशी लगेच संपर्क साधा.